वर्ष १४ वे

अंक ३ रा

सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

-: कार्यक्रमाचे स्थळ :-

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन,**

मालधक्का चौक, मंगळवार पेठ, पुणे ४११०११.

**रविवार दि. ०३.०८.२०१४ रोजी दुपारी ४.०० वा.**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

**यांचे मुखपत्र**

# संवाद

**ऑगस्ट-सप्टें.-ऑक्टो.-नोव्हेंबर २०१४**

फक्त सभासदांकरिता

(खाजगी वितरणासाठी)

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- राहिलेल्या बांधकामाचा अपेक्षित खर्च (टीडीआरसह) रु.८० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०′ x १४′
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ११००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

- **तळमजला व दोन मजले बांधून पूर्ण झाले असून त्यामध्ये ८० विद्यार्थी राहात आहेत.**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं. १७/४अ, मंगलनगर, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक : १९ जुलै, २०१४ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.०३.०८.२०१४** रोजी **दुपारी ४.३० वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मालधक्का चौक, मंगळवार पेठ, पुणे ११** येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.११.०८.२०१३ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.

२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २०१३-२०१४ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.

३) सन २०१४-२०१५ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

४) भावी कार्याची दिशा ठरविणे.

५) सन २०१४-२०१५ साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.

६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-**

१) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.

२) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी दुपारी ५.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल.

३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.२७.०७.२०१४** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

**✻ आपले नम्र ✻**

**हौसाराम घोडके**
अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार दुबे**
अध्यक्ष, बांधकाम समिती

**मधुकर शिरोळे**
उपाध्यक्ष

**सुनील पोटे**
सेक्रेटरी

**प्रा.गोरक्ष जगताप**
सहसेक्रेटरी

**बाजीराव जगदाळे**
कार्यवाहक

**अशोक वाबळे**
सहकार्यवाहक

**सदस्य :- सखाराम गागरे, डॉ.बाळासाहेब बांडे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, बाळासाहेब येणारे, प्रा.माधव गायके.**

## ✻ कार्यक्रमाचे स्थळ ✻

**रविवार दि.०३.०८.२०१४ रोजी दुपारी ४.३० वा.**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मालधक्का चौक,**
**मंगळवार पेठ, पुणे ४११ ०११. संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं. १७/४अ, मंगलनगर, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम **रविवार दि.०३ ऑगस्ट २०१४** रोजी **दुपारी ४.०० वाजता** **डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, मालधक्का चौक, मंगळवार पेठ, पुणे ४११०११** येथे खालील सन्माननियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

### * अध्यक्ष *

**मा.इंजि.चंद्रमोहन हंगेकर**
अधिक्षक अभियंता,
नाशिक पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे.

### * प्रमुख पाहुणे *

**मा.राजेंद्र माने (IPS)**
पोलीस उपायुक्त, पुणे शहर

**मा.डॉ.सुधाकर पठारे**
पोलीस उपायुक्त, पुणे शहर

**मा.प्रमोद गायकवाड**
उद्योगपती, नाशिक, पुणे

तरी आपण अगत्य उपस्थित रहावे, ही विनंती.

### * आपले नम्र *

**हौसाराम घोडके**
अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार ठुबे**
अध्यक्ष, बांधकाम समिती

**मधुकर शिरोळे**
उपाध्यक्ष

**सुनील पोटे**
सेक्रेटरी

**प्रा.गोरक्ष जगताप**
सहसेक्रेटरी

**बाजीराव जगदाळे**
कार्यवाहक

**अशोक वाबळे**
सहकार्यवाहक

**सदस्य :- सखाराम गागरे, डॉ.बाळासाहेब बांडे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, बाळासाहेब येणारे, प्रा.माधव गायके.**

### * कार्यक्रमाचे स्थळ *

**रविवार दि.०३.०८.२०१४ रोजी दुपारी ४.०० वा.**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मालधक्का चौक,**
**मंगळवार पेठ, पुणे ४११ ०११. संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

# संपादकीय

प्रिय सभासद,

प्रत्येक वर्षाचा जून महिना सुरू झाला की, शाळा-कॉलेजच्या निकालांकडे लक्ष लागते. **इ. १० वी व १२ वी**च्या निकालांकडे विद्यार्थ्यांपेक्षा पालकांचेच जास्त लक्ष असते. या निकालावरच विद्यार्थ्यांचे भवितव्य ठरते. आपला तालुका ही **ज्ञानाची खाण** असल्याने साहजीकच तालुक्यातील अनेक विद्यार्थी आपली गुणवत्ता सिद्ध करून दाखवत असतात. **गुणवत्ता मिळविलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी मनापासून हार्दिक अभिनंदन** करतो!

आज आपल्याशी चर्चा करताना मला मुद्दाम सांगावयाचे आहे की, पारनेर ही ज्ञानाची, विद्वत्तेची खाण आहे. हे मी नेहमी आपल्यासमोर मांडत असतो. ते यावर्षी आपल्या तालुक्यातील चार युवकांनी **यु.पी.एस.सी. परीक्षे**मध्ये यश मिळवून सिद्ध करून दाखविले आहे. **डॉ.संदिप साठे, प्रशांत सुंबे, योगेश उंडे व डॉ.गणेश पोटे** यांनी पारनेर तालुक्याचे नाव **राष्ट्रीय पातळीवर** नेले आहे. या यशाबद्दल सर्व पारनेरकरांतर्फे या युवकांचे हार्दिक अभिनंदन!

आजपर्यंत मंडळाचे **अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके** यांनी इतर कार्यकारिणी सदस्यांच्या सहकार्याने **४५ लक्ष रूपयांच्या देणग्या** गोळा केल्या आहेत. त्यामुळे **उर्वरीत दोन मजले बांधण्याचे नियोजन** मंडळामार्फत सुरू झाले आहे. या अंकाच्या मुखपृष्ठावर आवाहन केल्याप्रमाणे **१० लक्ष रूपये व १ लक्ष रूपये योगदान** देणाऱ्या दानशुरापर्यंत आपण पोहोचल्यास त्यांचे नाव मजल्यास किंवा खोलीस देता येईल. मी सर्व सभासदांना, वाचकांना व हितचिंतकांना अशा व्यक्तींचा शोध घेण्यासाठी विनंती करतो. या सार्वजनिक कार्यासाठी व विद्यार्थ्यांच्या हितार्थ आपण प्रामाणिक प्रयत्न करावेत ही अपेक्षा!

**पारनेर तालुका मित्र मंडळाची वेबसाईट** गेल्या २ वर्षांपासून **यशस्वीपणे** कार्यरत असून या वेबसाईटवर आपण आपल्या **व्यवसायाची प्रसिद्धी** करण्यासाठी **जाहिरात** दिल्यास त्याद्वारे मंडळाच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यास आर्थिक हातभार लागेल!

मंडळाच्या **वस्त्र बँक व बुक बँक** या योजना चांगल्या प्रकारे कार्यरत असून त्यास आपण उत्स्फुर्त प्रतिसाद देत आहात याबद्दल मंडळातर्फे मी आपल्या सर्वांचे आभार मानतो. नविन शैक्षणिक वर्ष सुरू होत असल्याने **ग्रामीण भागातील गरजू व हुशार विद्यार्थ्यांना आपण विद्यार्थी वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी** शिफारस करावी व वसतिगृहाची वेगळी ओळख या महानगरामध्ये निर्माण करावी अशी मंडळातर्फे विनंती करतो.

**दिनांक ०३ ऑगस्ट २०१४** रोजी मंडळाचे आयोजित केलेल्या **स्नेहमेळावा, ग्रामस्थ गौरव कार्यक्रम तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेस** आपण उपस्थित राहून मंडळाचे कार्यास प्रेरणा द्यावी व मार्गदर्शन करावे ही विनंती करून संपादकीयास अर्धविराम देतो.

जय जिजाऊ। जय शिवराय।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक



## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० | श्री.सखाराम गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ |
| इंजि.विजयकुमार ठुबे | अध्यक्ष,बां.स. | ९४२२०२६२२५ | श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| श्री.मधुकर शिरोळे | उपाध्यक्ष | ९९२२१६६१२५ | श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.सुनील पोटे | सेक्रेटरी | ९२२६९२१०८८ | श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| श्री.प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ | श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| श्री.बाजीराव जगदाळे | कार्यवाहक | ९०११०२१४३० | श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ | श्री.काशिनाथ गायकवाड | सदस्य | ९४२२०१७९४० |
| डॉ.बाळासाहेब बांडे | सदस्य | ९८२२०५१५९३ | प्रा.माधव गायके | सदस्य | ९८२२९९५०९७ |

# विद्यार्थी गौरव - दहावी


प्रसाद काशिनाथ आंधळे
रा.कर्जुले हर्या ९३.६०%


संकेत संजय नांगरे
रा.गोरेगाव - ९३%


शंतनु दत्तात्रय ठुबे
रा.कान्हुर पठार - ९१%


कु.तेजस्विनी ज्ञानदेव घुले
पिंपळगाव रोठा ८८.४०%


रोहीत बाळासाहेब दिघे
रा.वडझिरे - ८५%


कु.श्रद्धा संजय गहाणडुले
रा.रांधे - ८५%


कु.नयन रामचंद्र एरंडे
रा.वडझिरे - ८४.५%


कु.सायली प्रकाश दाते
रा.गारगुंडी - ८४%


कु.सलोनी सुमंत घोडके
रा.पारनेर - ८०%


दिपक संजीव जाधव
रा.पानोली - ७७%


कु.पुनम पंढरीनाथ दिघे
रा.वडझिरे - ७५%


कु.अनिशा हिरामण डेरे
रा.वडगाव आमली ७५%


सुजय किसन कुलट
रा.खा.टाकळी ७३.२०%


कु.वृंदा शिवाजी थिटे
रा.वाळवणे - ७३%


दिपक संजय काकडे
रा.कान्हुरपठार - ७१%


# कला-क्रीडा व पदविका



❊ **कु. ईश्वरी अनंतराव मातेरे,** रा.बाभुळवाडे हिची महाराष्ट्रातर्फे राष्ट्रीय शालेय लॉन टेनिस स्पर्धेमध्ये १७ वर्षाखालील मुलींच्या संघामध्ये निवड झाली होती. या संधीचे सोने करून तिने **अंतिम स्पर्धेमध्ये सुवर्णपदक** मिळविले. यापूर्वी तिला १२ वर्षाखालील मुलींच्या संघामध्येसुद्धा सुवर्णपदक मिळाले आहे. तीचे सध्याचे **राष्ट्रीय मानांकन २४** आहे. तसेच **महाराष्ट्रातील मानांकन ३** आहे.



❊ **कु. सुप्रभा रामदास पुजारी,** रा.पारनेर हिने एप्रिल २०१४ मध्ये १८ वर्षाखालील मुलींच्या गटातील **अखिल भारतीय मानांकन टॅलेंट सेरीज टेनिस स्पर्धेचे विजेतेपद** पटकाविले. त्यापूर्वी जाने. २०१४ मध्ये ६९ व्या राष्ट्रिय शालेय टेनिस स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये तिने महाराष्ट्राचे प्रतिनीधीत्व केले. तिचे सध्याचे **राष्ट्रीय मानांकन ७८** आहे.



❊ **सिद्धांत राजू लटांबळे,** रा. पिंपळनेर याने १४ वर्षाखालील पोहण्याच्या **आंतरराज्यीय फ्री स्टाईल स्पर्धेमध्ये देशात २रा क्रमांक** पटकाविला. तसेच त्याला डी.ए.व्ही.पब्लिक स्कुल, पुणे या संस्थेतर्फे **'बेस्ट स्पोर्टमन ऑफ द इयर'** हा बहुमान प्राप्त झाला.



❊ **कु. स्नेहल जनार्दन दाते** रा.गारगुंडी ही डिप्लोमा **ई. अँड टी.सी.** मध्ये **९२%** मार्कस् मिळवून सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली.




❊ **कु. मयुर अशोक वाबळे,** रा.निघोज यास **डिप्लोमा इन मॅकॅनिकल इंजिनियरींग** मध्ये ६८% मार्कस् मिळाले.



❊ **कु. अश्विनी जयसिंग मापारी,** रा. राळेगण सिद्धी हिस **बी.सी.ए.** मध्ये ६०% मार्क्स मिळाले.

# विद्यार्थी गौरव - बारावी सायन्स



ऋषीकेश दौलत येवले
रा.डिकसळ ९२%


मनिष संजय बागडे
रा.हंगे ८९.५%


शुभम गोरक्ष जगताप,
रा.बाबुर्डी ८६.५%


कु.श्वेता बाळासाहेब बांडे
रा. टाकळी ढो.८६%


कु.प्राची बाबाजी कदम
रा.पिंपरी जलसेन ८४%



सुरज अभिमान तराळ,
रा. तराळवाडी ८४%


कु.पुजा सोपान खोसे
रा.पाडळी दर्या ८४%


कु.कोमल गोरक्ष तिकोणे,
रा.पाडळी दर्या ८३%


कु.ज्योती चंद्रकांत बेलोटे
रा.देवी भोयरे ८३%


अनुज पोपट तांबडे
रा. तिखोल ८१%


योगेश यादव येवले
रा. डिकसळ ८०%


अनुप पोपट तांबडे,
रा. तिखोल ७८%


आकाश बाबासाहेब बांडे
रा.टाकळी ढो. ७७.५%


आकाश पोपट सोनवणे,
रा.अपधुप ७५%


कु.अंजली सुरेश ठाणगे
रा.तिखोल ७४%


कु.अपुर्वा नंदकुमार
झावरे, रा.भोंद्रे ७४%


शुभम पंजाबराव शेळके
रा.नारायणगव्हाण ७४%


कु.शुभानी शिवाजी थिटे,
रा.वाळवणे ७१%


शिवहरी सुरेश पुरी
रा. बाबुर्डी ७०%


शुभम सुरेश वराळ
रा.वडझिरे ६७%


तन्मय आनंद जाधव
रा.पाडळी दर्या - ६६%


ऋषीकेश दिलीप जाधव,
रा.वेसदरे ६२%


लवकेश संभाजी शेंडकर,
लोणी मावळा ६२%


कु.श्वेता भास्कर खोडदे,
रा.किन्ही ६२%

# विद्यार्थी गौरव - बारावी कॉमर्स


कु.विजयालक्ष्मी ज्ञानदेव
खोसे,रा.पाडळी द.८८%


कु.प्रतिक्षा किसन गागरे
रा.टाकळी ढो. ८७.५%


कु.हर्षदा शिवाजी विश्वास
रा.बाभुळवाडे - ६९%


कु.मृणाल संजय झावरे,
रा. भोंद्रे ६५%

# ग्रामस्थ गौरव



❊ **श्री.विजय विठ्ठलराव आदक** रा.**वाघुंडे** हे **पुणे शहर पोलीस दलामध्ये हवालदार** म्हणून कार्यरत असून त्यांना पोलीस खात्यातील **उत्कृष्ट कामगिरी बद्दल दि. १५.०८.२०१३** रोजीच्या **स्वातंत्र्य दिनानिमित्त** पोलीस सेवेचे अत्युच्च ''**राष्ट्रपती पोलीस पदक**'' प्रदान करण्यात आले.

❊ **डॉ.भाऊसाहेब मुरलीधर पाणगे,** एम.ए.(इंग्लिश), बी.लिब., पी.एच्.डी. रा.पाडळी तर्फे कान्हूर यांची पुणे **विद्यापीठातील प्रसिद्ध जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल व माहिती शास्त्र विभागाचे प्रमुख** म्हणून नियुक्ती झाली.





❊ **डॉ. संदिप प्रदीप साठे,** रा. हंगे हे एम.बी.बी.एस. असून **युपीएससी** परिक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची ऑल इंडिया **रँक ७०६** आहे.



❊ **श्री.प्रशांत आप्पासाहेब सुंबे,** रा.पाडळी तर्फे कान्हूर हे बी.ई. (ई.अँड टी.सी.) असून **युपीएससी** परिक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची ऑल इंडिया **रँक ७१८** आहे.



❊ **श्री.योगेश पांडुरंग उंडे,** रा.कर्जुले हरेश्वर हे बी.ई. (ई.अँड टी.सी.) असून **युपीएससी** परिक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची ऑल इंडिया **रँक ७३७** आहे.



❊ **डॉ.गणेश संपतराव पोटे,** रा.राळेगण सिद्धी हे एम.बी.बी.एस. असून यु.पी.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची ऑल इंडिया रँक ९७५ आहे.



❊ ज्येष्ठ सामाजिक, पर्यावरणवादी कार्यकर्ते व पिंपरी चिंचवड ज्येष्ठ नागरीक संघाचे सरचिटणीस **श्री.लालचंद उर्फ सुर्यकांत त्रिलोकचंद मुथीयान** रा.कान्हूर पठार यांची पिंपरी चिंचवड **जैन महासंघाच्या अध्यक्षपदी** बिनविरोध निवड झाली.



❊ **श्री. सोपान रंगनाथ खोसे** रा. पाडळी दर्या हे **पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या क्रिडा प्रबोधिनीमध्ये क्रिडा शिक्षक** म्हणून कार्यरत असून गेल्या १० वर्षात त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय खेळाडू तयार झाले. ते राष्ट्रीय / एशियन पंच म्हणून काम पाहात आहेत. त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल २०१३-१४ या शैक्षणिक वर्षातील **'शासकीय क्रीडा पुरस्कार'** त्यांना प्राप्त झाला.



❊ कुंदन लाईफ स्टाईलचे मालक **श्री.सागर कुंदनमलजी सांखला** रा.अळकुटी यांची **अखिल भारतीय स्थानकवासी जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय कार्यकारणीवर** पंचम विभागातून निवड झाली. तसेच त्यांची **पिंपरी चिंचवड जैन महासंघाच्या उपाध्यक्षपदी** सुद्धा निवड झालेली आहे.



❊ **सौ. कल्पनाताई भगवान पठारे,** रा. राळेगण सिद्धी यांना महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास परिषद पुणे या संस्थेतर्फे **भारतरत्न जे.आर.डी. टाटा** यांना अभिप्रेत असलेली २१व्या शतकातील यशस्वी महिला उद्योजिकांना देण्यात येणाऱ्या ''**उद्योग सखी**'' या मानाच्या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आलेले आहे.



**सौ. कल्पनाताई पठारे 'उद्योग सखी'** पुरस्कार स्विकारताना, डावीकडून श्री.मनोहर पारळकर - निवृत्त महाव्यवस्थापक, टाटा मोटर्स लि. व उजवीकडे डॉ.प्र.चि.शेजवलकर, जेष्ठ व्यवस्थापन तज्ञ.

# नांदा सौख्य भरे

❖ प्राचार्य संभाजी अण्णासाहेब पठारे, रा. वडुले यांचे सुपुत्र **चि.जयदिप** व ॲड. राजेंद्र बाळासाहेब लगड रा. लोणी बु.।। ता. राहाता यांची सुकन्या **सौ.निकीता** यांचा शुभविवाह **दि.०१.०५.२०१४** रोजी संपन्न झाला.

❖ श्री.दत्तात्रय माधवराव भोसले, रा.अळकुटी यांची सुकन्या **सौ. सोनम** व श्री. दत्तात्रय त्रिंबक आवारी, रा.रांधे यांचे सुपुत्र **चि. मोहन** तसेच श्री.भोसले यांची दुसरी सुकन्या **सौ. सविता** व श्री.दगडू लंके रा.निघोज यांचे सुपुत्र **चि. हरिश्चंद्र** यांचा शुभविवाह **दि.०१.०५.२०१४** रोजी संपन्न झाला.

❖ श्री. पोपटराव बाळाजी भालेकर, रा.रायतळे यांची सुकन्या **सौ. क्षीतीजा** व श्री. सुरेश धोंडीराम भोंगळे रा.फलटण यांचे सुपुत्र **चि. तेजस** यांचा शुभविवाह **दि.१०.०५.२०१४** रोजी संपन्न झाला.

❖ श्री. बबनराव गणपत खामकर, रा. वडगाव सावताळ यांचे सुपुत्र **डॉ.अजीत** व श्री.अशोकराव नवनाथ काळे, रा.दगडवाडी, ता.पाथर्डी यांची सुकन्या **डॉ.सौ.शितल** यांचा शुभविवाह **दि. ११.०५.२०१४** रोजी संपन्न झाला.

❖ श्री. चंद्रकांतजी कचरदासजी कटारीया रा. राळेगण थेरपाळ यांचे सुपुत्र **डॉ. राहुल** व श्री. विनोदलालजी पोपटलालजी गुगळे रा. करमाळा यांची सुकन्या **डॉ.सौ. भाग्यश्री** यांचा शुभविवाह **दि. १२.०५.२०१४** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.कटारिया यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❖ श्री. रामचंद्र शिवराम भागवत, रा. पारनेर यांचे सुपुत्र **चि.महेश** व श्री.एकनाथ धोंडीबा वाकोतकर, रा. वालसा (वडाळा) ता. भोकरदन जि.औरंगाबाद यांची सुकन्या **सौ. कांचन** यांचा शुभविवाह **दि.१९.०५.२०१४** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.भागवत यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❖ श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र पोटघन, रा. जातेगाव यांची सुकन्या **सौ. प्रिया** व श्री.बाळासाहेब भाऊसाहेब शेळके रा.नारायणगव्हाण यांचे सुपुत्र **चि. सचिन** यांचा शुभविवाह **दि. २४.०५.२०१४** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.पोटघन यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.

❖ श्री. बाबुराव विष्णु तरटे, रा. म्हसने, यांचे सुपुत्र **चि.सूरदास** व श्री.अविनाश बाबुराव फलके, रा.निमगाव वाघा, ता. नगर यांची सुकन्या **सौ.प्रियंका** यांचा शुभविवाह **दि. २४.०५.२०१४** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.तरटे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❖ श्री. दत्तात्रय जयराम पठारे, रा.जवळे यांची सुकन्या **सौ.भाग्यश्री** व श्री.सुभाष देवराम औटी, रा.टाकळी ढोकेश्वर यांचे सुपुत्र **चि.प्रदीप** यांचा शुभविवाह **दि. २५.०५.२०१४** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.पठारे यांनी मंडळास **रू.१५०१/-** देणगी दिली.

❖ श्री. बबन गणपत भालेकर, रा. रायतळे यांचे सुपुत्र **चि.शिरीष** व श्री. संजय दगडू गोरे, रा. वांबोरी, ता. राहुरी यांची सुकन्या **सौ.प्रियंका** यांचा शुभविवाह **दि. २५.०५.२०१४** रोजी संपन्न झाला.

❖ श्री. भाऊसाहेब कोंडीभाऊ आहेर, रा.पळसपूर यांचे सुपुत्र **चि. विवेक** व श्री.सुभाष बाबुराव ढवळे रा.निघोज यांची सुकन्या **सौ.योगिता** यांचा शुभविवाह **दिनांक २६.०५.२०१४** रोजी संपन्न झाला.

❖ श्री. रभाजी नाना वाळुंज, रा. टाकळी ढोकेश्वर यांचे सुपुत्र **चि. गणेश** व श्री.धोंडीभाऊ त्र्यंबकराव गुंजाळ, रा.गुंजाळवाडी, ता.संगमनेर यांची सुकन्या **सौ. जयश्री** यांचा शुभविवाह **दि. ३०.०५.२०१४** रोजी संपन्न झाला.

❖ श्री. भाऊसाहेब कोंडीभाऊ आहेर, रा.पळसपूर यांचे सुपुत्र **चि. आशिष** व श्री.निळकंठ नाथू ठुबे, रा. कान्हुर पठार यांची सुकन्या **सौ. भाग्यश्री** यांचा शुभविवाह **दिनांक ०७.०६.२०१४** रोजी संपन्न झाला.

# आवाहन

मंडळाचे वसतिगृह बांधून **चार** वर्षे झाले. गेले **तीन** वर्षे वसतिगृह संपूर्ण भरत आहे. मंडळाला अजून दोन मजले बांधावयाचे आहे. साधारणतः **५००० स्क्वे.फुट बांधकाम** असून बांधकामाचा खर्च अंदाजे **रू.६० लाख** येणार आहे. बांधकामासाठी टी.डी.आर. विकत घ्यावा लागेल. त्यास अंदाजे **रू.२० लाख** खर्च येणार आहे. याशिवाय फर्निचरचा खर्च वेगळाच. सध्या मंडळाकडे **रू.४५ लाख** जमा झालेले आहेत. मंडळाने महानगरपालिकेकडे बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव दाखल केलेला आहे. त्यास परवानगी मिळून बांधकामास सुरूवात करावयाची आहे. वरच्या दोन मजल्यामध्ये **२० खोल्या** होणार आहेत. मागील दोन मजल्यांच्या सर्व खोल्यांना देणगीदारांनी सढळ हाताने मदत केलेली आहे. याही बांधकामाला सर्वांकडून अशाच देणगीची अपेक्षा आहे. **आपण देणगी दिल्यास आपल्या प्रिय व्यक्तीचा स्मृतीगंध एका चांगल्या कामासाठी कायमचाच सर्वांच्या लक्षात राहील.**

**रूपये एक लक्ष देणगी दिल्यास देणगीदाराने सुचविलेले नाव त्या खोलीला देण्यात येईल.** तरी सर्वांनी सढळ हाताने देणग्या द्याव्यात ही विनंती.

**हौसाराम घोडके, अध्यक्ष**


# आपण असे केले तर



❊ **पिताश्री वै. सखाराम मारुतराव जगताप (मृत्यु दिनांक ०६.०१.२०११) व मातोश्री वै. विजयाबाई सखाराम जगताप (मृत्यु दिनांक ०३.१०.२०१२)** रा. गोरेगाव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री.संदिप व श्री.सचिन यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.




❊ **सौ.सुजाता विजयकुमार ठुबे,** रा.कान्हुर पठार यांनी त्यांच्या **दि. २९.०३.२०१४** च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.विजयकुमार गोविंदराव ठुबे,** रा.कान्हुर पठार यांनी त्यांचे सुपुत्र **श्री.प्रतिक** (I.P.S.) यांचे **दि. ०२.०४.२०१४** रोजीच्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ प्रा.दिलीप वामन बागूल रा.मांडवे खुर्द यांनी त्यांचे सुपुत्र **चि. विश्वजीत** यांच्या दि.११.४.२०१४ च्या वाढदिवसानिमित्त यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ पारनेर तालुका मित्र मंडळाचे संस्थापक **अध्यक्ष कै.वामन शंकर भोंग गुरूजी** यांच्या दि.०२.०५.२०१४ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांच्या सुनबाई श्रीमती मंदाताई विनायक कुलकर्णी यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.



❊ **स्व. बसंतीबाई बन्सीलालजी गांधी** रा.सुपे यांच्या दि.११.०५.२०१४ च्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री.अशोकलालजी यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली.



❊ **श्री.अशोक तबाजी थोरात,** रा.पिंपरी जलसेन यांनी त्यांच्या **०१.०६.२०१४** च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.




❊ **श्री.चंदनमल मुळचंदजी गांधी,** रा.सुपे यांनी त्यांच्या पत्नी **स्व.कुसुमबाई** यांच्या **दि. ११.०७.२०१४** च्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त मंडळास रू.१००१/- देणगी दिली.



❊ **कै.गिरीधारीलाल बिरदीचंद कटारिया** रा.तिखोल यांच्या दि. ०८.०८.२०१४ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.नितीन यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. उत्तमचंद रामचंद कर्नावट** रा. खडकवाडी यांनी त्यांचे सुपुत्र **स्व. मनोज** यांच्या दिनांक १०.०८.२०१४ च्या स्मृती दिनाप्रित्यर्थ मंडळास **रु.११००/-** देणगी दिली.



**कै.आबासाहेब पुंजाजी लगड गुरूजी**, रा.लोणी ता.राहाता यांचे स्मरणार्थ सुपुत्र ॲड. सुरेश आबासाहेब लगड (सहाय्यक सरकारी वकील, अ'नगर जिल्हा न्यायालय) यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ श्री.बाळासाहेब हरिभाऊ येणारे, रा. रायतळे यांनी त्यांचे सुपुत्र **चि. स्वराज** याच्या दिनांक ०९.०४.२०१४ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

## निधन वार्ता

❊ **हरीभाऊ सावळेराम चितळकर,** वय १०९ वर्षे, रा. रायतळे यांचे **दिनांक १३.०४.२०१४** रोजी निधन झाले.



❊ **सौ.रखमाबाई भागाजी वाफारे,** वय ७७ वर्षे, रा.वाफारेवाडी यांचे **दि.१७.०४.२०१४** रोजी निधन झाले.



❊ **नानाभाऊ बाबुराव घेमूड,** वय ८० वर्षे, रा. पिंपरी जलसेन यांचे **दि.०२.०५.२०१४** रोजी निधन झाले.



❊ **सौ.रखमाबाई विठ्ठल थोपटे,** वय ६८ वर्षे, रा. टाकळी ढोकेश्वर यांचे **दिनांक ०४.०५.२०१४** रोजी निधन झाले.

❊ **प्रकाश झुंजारराव जगदाळे,** वय ५४ वर्षे, रा. बाभुळवाडे यांचे **दि.२२.०५.२०१४** रोजी निधन झाले.

## सेवानिवृत्ती



❊ **श्री. नामदेव लक्ष्मण ठुबे**, रा.पारनेर हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतून १५ वर्षे ९ महिन्याच्या सेवेनंतर **फायरमन** या पदावरून **दि.३१.०३.२०१४** रोजी सेवानिवृत्त झाले. त्याअगोदर ते सैन्य दलामध्ये २४ वर्षे सेवा करून **सुभेदार** या पदावरून सेवानिवृत्त झाले होते. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **प्रा.श्री.नानासाहेब लहानू काकडे**, रा.डिकसळ हे रयत शिक्षण संस्थेमधून ३२ वर्षे ८ महिन्यांच्या सेवेनंतर **दि. ३१.०५.२०१४** रोजी सेवानिवृत्त झाले. ते संस्थेच्या ज्युनियर कॉलेजवर **लेक्चरर** म्हणून कार्यरत होते. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.




❊ **श्री. धोंडीबा काशिनाथ कारखिले**, रा. राळेगण थेरपाळ हे महाराष्ट्र राज्याच्या पाटबंधारे विभागातून ३६ वर्षांच्या सेवेनतर कॅनॉल इन्स्पेक्टर म्हणून **दि.३१.०५.२०१४** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री.संदिप** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. गंगाधर भिवा कोठावळे**, रा.सांगवी सुर्या हे सारस्वत सहकारी बँकेतून ३७ वर्षांच्या सेवेनंतर **चिफ मॅनेजर** या पदावरून **दि. ३०.०६.२०१४** रोजी सेवानिवृत्त झाले.

## निधन वार्ता



❊ **रावसाहेब गेणू ठुबे**, वय ८३ वर्षे रा. कान्हुर पठार यांचे **दि.२५.०४.२०१४** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीनिमित्त त्यांचे चिरंजीव श्री.बाळासाहेब यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **रामदास मारूती लाळगे**, वय ५३ वर्षे रा. लोणी मावळा यांचे **दि.०४.०६.२०१४** रोजी निधन झाले.



❊ **श्रीमती तुळसाबाई मेथाजी बोरकर**, वय ८५ वर्षे, रा.वडझिरे यांचे **दि.१७.०६.२०१४** रोजी निधन झाले.

## अभिनंदन !



❊ **डॉ. सुधाकर भानुदास पठारे**, रा.वाळवणे, हे पुणे पोलीस आयुक्तालयात पोलीस उपायुक्त असून त्यांच्या प्रशंसनीय कार्याबद्दल त्यांना **''पोलीस महासंचालक पदक''** मा.अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.



❊ **सौ. स्वाती सुधीर कांबळे**, रा.पुणे या पुणे जिल्हा परिषदेमध्ये शिक्षीका म्हणून कार्यरत असून त्यांना उत्कृष्ट शैक्षणिक व कामगिरीबद्दल पुणे जिल्हा परिषदेतर्फे **''आदर्श शिक्षिका''** पुरस्कार **मा.नाम. जयंत पाटील** यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



❊ **सौ.स्नेहल प्रभात शिर्के (गागरे)** यांना **कौन्सिल ऑफ साईंटीफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च नेट २०१३** च्या परीक्षेत **४३ वी रँक** मिळाली. तसेच त्यांना **सेट परीक्षेत ७० टक्के** मार्क्स मिळून उत्तीर्ण झालेल्या आहेत. सौ. स्नेहल या मंडळाचे सदस्य श्री.रामदास शिर्के यांचा स्नुषा आहेत.



❊ **श्री. सुरेश ज्ञानदेव जासूद**, रा. भोरवाडी, ता.नगर हे टाटा मोटर्स एम्प्लॉईज युनियन मध्ये **२०१४ ते २०१७** या कालावधीसाठी **कामगार प्रतिनिधी** म्हणून **तिसऱ्यांदा निवडून आले**. ते केंद्र सरकारच्या पुणे डिव्हीजनल प्रॉडक्टीव्हिटी कौन्सिल गव्हर्निंग बॉडीवर **महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व** करतात.

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२०१३ ते ३१.०३.२०१४ अखेरचे

| जमा | रक्कम रू. | रक्कम रू. | खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | | | बँक चार्जेस | 984.34 | |
| रोख | 576.00 | | वार्षिक सभा व समारंभ खर्च | 17512.00 | |
| बँक ऑफ महाराष्ट्र - 53512 | 493231.00 | | देखभाल व दुरूस्ती खर्च | 32093.00 | |
| स्टेट बँक - 3003184978 | 998699.00 | | इमारत दुरूस्ती खर्च | 10000.00 | |
| महानगर को-ऑप.बँक | 40160.00 | | शैक्षणिक मदत | 14000.00 | |
| सुवर्णयुग सह. बँक - 1770 | 357338.55 | 1890004.55 | वैद्यकिय मदत | 1375.00 | |
| | | | साफसफाई खर्च | 50364.00 | |
| बचत ठेव व्याज खाते | | 53299.00 | पगार | 244800.00 | |
| मुदत ठेव व्याज खाते | | 206074.00 | प्रवास खर्च | 7636.00 | |
| | | | लिहीणावळ खर्च | 5000.00 | |
| ईमारत निधी | | 1204488.00 | ऑडीट फी | 5000.00 | |
| | | | वेब साईट खर्च | 7000.00 | |
| हॉस्टेल फी | | 800629.00 | प्रोफेशनल चार्जेस | 7500.00 | |
| फॉर्म फी | | 2415.00 | झेरॉक्स खर्च | 2295.00 | |
| हॉस्टेल फी दंड | | 315.00 | वीजबील खर्च | 185800.00 | |
| मुदत ठेव जमा | | 1000000.00 | किरकोळ खर्च | 4857.00 | |
| | | | प्रॉपर्टी टॅक्स | 47027.00 | |
| | | | बिगर शेत सारा | 1360.00 | |
| | | | इलेक्ट्रीकल खर्च | 15514.00 | |
| | | | छपाई स्टेशनरी खर्च | 53510.00 | 713627.34 |
| सिक्युरिटी डिपॉझिट | | 140280.00 | सिक्युरिटी डिपॉझिट | | 114275.00 |
| | | | अनामत | | |
| | | | अनंदा शिंदे | 14500.00 | |
| | | | पुंजाराम घशिंग | 1000.00 | 15500.00 |
| | | | मुदत ठेव जमा | | 3100000.00 |
| | | | मुदत ठेव व्याज येणे | | 87564.00 |
| | | | टि.डि.एस. | | 10700.00 |
| | | | मालमत्ता खर्च | | |
| | | | फोम गादया खरेदी | 176000.00 | |
| | | | वॉटर प्युरिफायर खरेदी | 6600.00 | 182600.00 |
| | | | अखेर शिल्लक | | |
| | | | रोख | 871.00 | |
| | | | बँक ऑफ महाराष्ट्र - 53512 | 624795.00 | |
| | | | स्टेट बँक - 3003184978 | 61379.00 | |
| | | | महानगर को-ऑप.बँक | 21403.00 | |
| | | | सुवर्णयुग सह. बँक - 1770 | 364790.21 | 1073238.21 |
| एकूण रक्कम | | 5297504.55 | एकूण रक्कम | | 5297504.55 |

| सुनील पोटे | मधुकर शिरोळे | हौसाराम घोडके | मे.के.बी.साळुंके अँड कं. |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२०१३ ते ३१.३.२०१४ अखेरचे

| जमा | रक्कम रू. | रक्कम रू. | खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| बँक चार्जेस | 984 . 34 | | बचत ठेव व्याज खाते | | 53299 . 00 |
| वार्षिक सभा व समारंभ खर्च | 17512 . 00 | | मुदत ठेव व्याज खाते | | 206074 . 00 |
| देखभाल व दुरूस्ती खर्च | 32093 . 00 | | | | |
| इमारत दुरूस्ती खर्च | 10000 . 00 | | | | |
| शैक्षणिक मदत | 14000 . 00 | | | | |
| वैद्यकिय मदत | 1375 . 00 | | हॉस्टेल फी | | 800629 . 00 |
| साफसफाई खर्च | 50364 . 00 | | फॉर्म फी | | 2415 . 00 |
| पगार | 244800 . 00 | | हॉस्टेल फी दंड | | 315 . 00 |
| प्रवास खर्च | 7636 . 00 | | | | |
| लिहीणावळ खर्च | 5000 . 00 | | | | |
| ऑडीट फी | 5000 . 00 | | | | |
| वेब साईट खर्च | 7000 . 00 | | | | |
| प्रोफेशनल चार्जेस | 7500 . 00 | | | | |
| झेरॉक्स खर्च | 2295 . 00 | | | | |
| वीजबील खर्च | 185800 . 00 | | | | |
| किरकोळ खर्च | 4857 . 00 | | | | |
| प्रॉपर्टी टॅक्स | 47027 . 00 | | | | |
| बिगर शेत सारा | 1360 . 00 | | | | |
| इलेक्ट्रीकल खर्च | 15514 . 00 | | | | |
| छपाई स्टेशनरी खर्च | 53510 . 00 | 713627 . 34 | | | |
| घसारा | | 74820 . 00 | | | |
| नफा ताळेबदास वर्ग | | 274284 . 66 | | | |
| एकूण रक्कम | | 1062732 . 00 | एकूण रक्कम | | 1062732 . 00 |

| सुनील पोटे | मधुकर शिरोळे | हौसाराम घोडके | मे.के.बी.साळुंके अँड कं. |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी मदत,**
**म्हणजेच आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी मदत !**
**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा,**
**आपल्या नातेवाईक, मित्रमंडळींना मदत करायला सांगा !**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## ताळेबंद पत्रक ३१.०३.२०१४ अखेरचे

| जिंदगी व देणी | रक्कम रू. | रक्कम रू. | स्थावर मालमत्ता व येणी | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| ट्रस्ट निधी | | | स्थिर मालमत्ता | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | 73294.00 | जमीन खरेदी | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | 845311.00 |
| इतर निधी | | | | | |
| इमारत निधी | | 11681840.03 | इमारत बांधकाम | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | 10477352.03 | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | 6303505.00 |
| अधिक जमा - चालू वर्षी | 1204488.00 | | | | |
| | | | बोअरवेल - मागील ताळेबंदाप्रमाणे | | 10050.00 |
| शैक्षणिक फंड | | | | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | 96725.00 | मोटरपंप - मागील ताळेबंदाप्रमाणे | | 24165.00 |
| अंत्यविधी जमा निधी | | | फर्निचर व फिक्स्चर | | 667437.71 |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | 130122.00 | मागील ताळेबंदाप्रमाणे | 565597.71 | |
| | | | चालू वर्षी वाढ | 176000.00 | |
| हॉस्टेल डिपॉझिट | | 88905.00 | | 741597.71 | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | 62900.00 | | वजा घसारा - 10% | 74160.00 | |
| अधिक जमा - चालू वर्षी | 140280.00 | | | | |
| | 203180.00 | | वॉटर प्युरिफायर खरेदी | 6600.00 | 5940.00 |
| वजा - चालू वर्षी | 114275.00 | | वजा घसारा - 10% | 660.00 | |
| | | | वृक्ष संवर्धन ठेव | | 9000.00 |
| उत्पन्न खर्च खाते | | 91524.89 | मागील ताळेबंदाप्रमाणे | | |
| | | | एम.एस.ई.बी. डिपॉझिट | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | 10000.00 |
| | | | मुदत ठेव | | 3100000.00 |
| | | | अनामत | | |
| | | | अनंदा शिंदे | 14500.00 | |
| | | | पुंजाराम घशिंग | 1000.00 | 15500.00 |
| | | | मुदत ठेव व्याज येणे | | 87564.00 |
| | | | टि.डि.एस. | | 10700.00 |
| | | | उत्पन्न खर्च खाते | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | 182759.77 | |
| | | | वजा - नफा चालू वर्षी | 274284.66 | |
| | | | | 91524.89 | |
| | | | रोख व बँक शिल्लक | | |
| | | | रोख | 871.00 | |
| | | | बँक ऑफ महाराष्ट्र - 53512 | 624795.00 | |
| | | | स्टेट बँक - 3003184978 | 61379.00 | |
| | | | महानगर को-ऑप. बँक | 21403.00 | |
| | | | सुवर्णयुग सह. बँक - 1770 | 364790.21 | 1073238.21 |
| एकूण रूपये | | 12162410.92 | एकूण रूपये | | 12162410.92 |

| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# नाथ एलिव्हेटर्स

इमारतींच्या लिफ्टचे मॅन्युफॅक्चरर्स

**Nath ELEVATORS**

- Manufacturer of Elevators,
- Installation Commissioning &
- Maintenance of all type of Lifts.

Prop. : Y.D.Bhusare Patil
Cell : 9890909945
9552528284

S.No.4/1+2, Narsiha Colony, Next to Balaji Law College, Thathwade, Pune - 411033.
Tel. : (O) 020-65104322 E-mail : nath.elevatorspune@gmail.com

---

**Shri. B. P. Khodade & Co.**
(Engineers & Govt. Contractor)



Sangvi, Pune - 411027.

**Mobile : 9822563390**

**Building, Roads & Drainage**
**ON HIRE :-**
J.C.B., DUMPERS & COMPRESSORS

---



जुनी नाती जपू या, नवी नाती जुळवू या...

# ।। शुभ विवाह ।।

# मराठा वधू-वर सूचक केंद्र



संचालक : प्रा.रावसाहेब बढे (M.A., B.Ed.)
मोबाईल - ९७६२०४३६१६, ९६०४१३१०३२
सीता निवास, विठ्ठल मंदिरामागे, विठ्ठलवाडी, आकुर्डी, पुणे ३५
शाखा - अंबर प्लाझा, एस.टी.स्टँड व ए.डी.सी.सी.बँकेजवळ, अहमदनगर.
www.badhemaratha.com Email : badhe.raosaheb@gmail.com

---

# AARYAN SOLAR SYSTEMS

**एकदाच गुंतवा, आयुष्यभर वाचवा!**
३०% पर्यंत सरकारी अनुदान मिळवा.

**Tel.:**
**9822060922**

- वीजेची/गॅसची आवश्यकता नाही.
- सुरक्षीत
- पर्यावरणास अनूकूल



*Racold*

**Bring Home India's No.1 Solar Water System**

।। विना सहकार नाही उद्धार ।।

# श्री साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित



नोंदणी क्र.: पीएनए/एचएलआय/आरएसआर /९४१/१९९३-९४ स्थापना : ३ मे १९९३

आशियाना टॉवर्स, सातपुडा हौसिंग सोसा. सांगवी, पुणे - २७. मो.: ९०११५५८११०

मूळच्या अ'नगर जिल्ह्यातील परंतु पुणे येथे स्थायीक झालेल्या मंडळींनी सामाजिक जाणीवेचे भान ठेवून स्थापित केलेली व अल्पावधीत सभासदांच्या विश्वासास पात्र ठरलेली पतपेढी. संस्थेची वैशिष्ट्ये–

✣ संस्थेच्या मालकीचे संगणकीकृत कार्यालय ✣ तत्पर सेवा ✣ ठेवीवर आकर्षक व्याजदर
✣ सभासदांच्या गुणवान पाल्यांचा यथोचित सत्कार ✣ विनयशील कर्मचारी वर्ग
✣ सभासदांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यावर जास्तीत जास्त भर.



श्री.सखाराम कोंडिबा गागरे
संस्थापक अध्यक्ष




श्री.पोपटराव आनंदराव जाधव
अध्यक्ष




श्री.नवीनचंद्र श्रीकिसन नाबरिया
उपाध्यक्ष



श्री.अरुण मार्तंड नरसाळे
सेक्रेटरी




श्री.पांडुरंग विश्वनाथ चाफे
संचालक



श्री.मुरलीधर पंढरीनाथ चौधरी
संचालक



श्री.कुंडलिक विश्वनाथ घोडके
संचालक




श्री.गोविंद दामोधर ढोरमले
संचालक



सौ.अलका दिलीप हरेल
संचालिका



श्री.निशांत रंगनाथ गिरी
संचालक




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.



संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ढुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
कार्याध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री. सुनील तोटे (suniltote11@gmail.com) (Cell : 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ____________________

____________________

____________________

____________________